प्रकरण : पाच

# उपसंहार

## प्रकरण – पाच

# उपसंहार

प्रस्तुत प्रबंधिकेत रा. रं. बोराडे यांच्या 'सावट' (१९८७) आणि 'चारापाणी' (१९९०) या दोन कादंबऱ्यांचा अभ्यास केला आहे. मराठी ग्रामीण कादंबरीच्या क्षेत्रात बोराडे यांच्या कादंबऱ्या वैशिष्ट्यपूर्ण आहेत. खेड्यातील बदलत्या वास्तवाचे चित्रण त्यांच्या जवळजवळ सर्वच कादंबऱ्यांमध्ये येते. रा. रं. बोराडे यांनी कथा, कादंबरी, नाटक, समीक्षा इ. वाङ्मयप्रकार हातळलेले आहेत. ग्रामीण जीवनातील सामाजिकता, वास्तवता आणि मानवी जीवनातील नातीगोती यांचे प्रत्ययकारी चित्रण रा. रं. बोराडे आपल्या 'सावट' आणि 'चारापाणी' या कादंबऱ्यांमध्ये करतात. म्हणूनच या दोन कादंबऱ्या अभ्यासासाठी निवडलेल्या आहेत. 'सावट' आणि 'चारापाणी' या कादंबऱ्यांचा आशय आणि अभिव्यक्तीच्या अंगानी विचार केला आहे.

पहिल्या प्रकरणामध्ये 'ग्रामीण कादंबरीची वाटचाल व विकास' यांचा विचार केला. त्यामध्ये म. फुले यांचे साहित्य ग्रामीण लेखकांना प्रेरणादायी ठरलेले आहे. कृष्णराव भालेराव, धनुर्धारी (रा. वि. टिकेकर), ना. वि. कुलकर्णी आणि सानेगुरूजी यांच्या लेखनातून ग्रामीण कादंबरीच्या पाऊलखुणा दिसतात. १९२४ नंतरची ग्रामीण कादंबरी गांधीवादाच्या प्रेरणेतून लिहिली जाऊ लागली. परंतु ती प्रबल बनू शकली नाही. मराठीतील पहिल्या ग्रामीण कादंबरीचा मान रा. वि. टिकेकर उर्फ धनुर्धारी यांच्या 'पिराजी पाटील' (१९०३) या कादंबरीस दिला गेला. धनुर्धारी, ना. वि. कुलकर्णी यांचे ग्रामीण कादंबरीलेखन स्वयंभू वाटते. समाजातील वास्तव जीवन रेखाटण्याचा प्रयत्न दिसतो. ग्रामीण जीवन हेही साहित्याचा विषय होऊ शकते, हे या लेखकांच्या लेखणाने दाखवून दिले.

१९४०-५० पर्यंतच्या कादंबरीच्या प्रेरणा आणखी भिन्न आहेत. जीवनशोध घेणे; जीवनदर्शन घडविणे ही प्रेरणा यावेळच्या कादंबऱ्यांची असलेली दिसते. तसेच गांधीवाद आणि मार्क्सवाद यामध्ये या प्रेरणा दिसतात. कादंबरीची कक्षा मोठी झाली तरीही फडकेतंत्राचाच अवलंब केलेला दिसतो. तरीही वेगळेपणाचे भानही असलेले दिसते. र. वा. दिघे, ग. ल. ठोकळ, मर्ढेकर, बी. रघुनाथ, म. भा. भोसले, वा. ब. कर्णिक यांनी या कालखंडातील कादंबरी वाङ्मय घडविण्यात हातभार लावलेला दिसतो. विभावरी शिरूरकरांनी तर 'बळी' (१९५०) ही कादंबरी लिहून मराठी कादंबरीला एक वेगळेच वळण दिले. त्यामध्ये काही

प्रमाणात प्रादेशिक वैशिष्ट्यांचीही जोड असलेली दिसते परंतु मुख्यतः ती ग्रामीणच होती. प्रादेशिकतेचा म्हणावा तितका स्पर्श झालेला नव्हता.

१९५०-६० च्या दशकामध्ये मात्र ग्रामीण कादंबरीत चांगलीच भर पडलेली दिसते. यामध्ये श्री. ना. पेंडसे, गो. नी. दांडेकर, व्यंकटेश माडगूळकर यांनी प्रादेशिकतेला साहित्यात महत्त्व मिळवून दिले. यावेळच्या कादंबरीत गांभीर्य जाणवते. खरे तर हेही लेखक मध्यमवर्गीय जाणीवा घेऊनच या जीवनाकडे वळलेले दिसतात. माडगूळकरांच्या 'बनगरवाडी' या कादंबरीने ग्रामीण कादंबरीत मोलाची भर घातली आणि प्रादेशिकतेची कक्षाही रूंदावली गेली. निसर्गावर अवलंबून असणारं जीवन या प्रादेशिकतेमध्ये प्रामुख्याने चित्रित होताना दिसते.

१९६०-७५ हा ग्रामीण कादंबरीचा संक्रमणकाळ म्हणावा लागेल. ही कादंबरी नव्या पिढीची नवनिर्मिती अहे. पेंडसे-दांडेकर-माडगूळकर ही पहिली पिढी ग्रामजीवनापासून थोडी दूर गेल्यासारखी वाटते. अगोदरच्या लेखकांच्या काही मर्यादापासून उध्दव शेळके, हमीद दलवाई, रा. रं. बोराडे, आनंद यादव हे बऱ्याच प्रमाणात दूर होते. सामान्य माणूस कादंबरीचा केंद्रबिंदू मानला गेला, बोराडे, यादव, महानोर, महादेव मोरे यांच्या लेखनात हा बदल स्पष्टपणे दिसतो. या काळातील ग्रामीण कादंबरी ग्रामजीवनाच्या अधिक जवळ गेली.

उदा. 'गोतावळा', 'पाचोळा' इ. ही कादंबरी प्रादेशिकतेऐवजी ग्रामीणतेकडे जास्त झुकते. अण्णाभाऊ साठे, चंद्रकुमार नलगे, शंकर खंडू पाटील, श्रीपाद काळे असे काही लेखक प्रचलित रचनातंत्रात अडकलेले दिसतात. बाबा कदम, देवदत्त पाटील हे लेखक ग्रामीण घटकांचा वापर मनोरंजनासाठी करताना दिसतात. या काळात ग्रामीण कादंबरीने आपले स्थान जोपासले आहे.

१९७५ नंतर ग्रामीण साहित्याची चळवळ सुरू झालेली दिसते. तिला 'आधुनिक ग्रामीण साहित्य' हे नाव दिले. यावेळी अधिक प्रमाणात कथात्म साहित्य लिहिले गेले. या कालखंडात आनंद पाटील, पुरूषोत्तम बोरकर, बाबाराव मुसळे, वासुदेव मुलाटे, रामचंद्र पठारे, राजन गवस, उत्तम बंडू तुपे असे अनेक नव्या दमाचे लेखक पुढे आलेले दिसतात. या काळात तर ग्रामीण कादंबरीची कक्षा खूपच रूंदावलेली दिसते. गावकुसाबाहेरचे दलित जीवन, भटक्या विमुक्तांचे जीवन तसेच आदिवासी लोकांचे जीवन हे सारेच प्रवाह ग्रामीण कादंबरीत आलेले दिसतात.

या संपूर्ण ग्रामीण कादंबरीत रा. रं. बोराडे यांचे स्थान वैशिष्ट्यपूर्ण असे आहे. त्यांच्या

'सावट' आणि 'चारापाणी' या दोन्ही कादंबऱ्या ग्रामीण जीवनाचं वास्तव चित्रण करतात. बोराडे यांनी ग्रामीण कथालेखक म्हणून जसे आपले स्थान निर्माण केले तसेच ते एक श्रेष्ठ कादंबरीकार असल्याचंही या प्रबंधिकेत नमूद केले आहे.

दुसऱ्या प्रकरणामध्ये 'रा. रं. बोराडे यांची ग्रामीण साहित्यविषयक आणि कादंबरी लेखनामागील भूमिका व प्रेरणा' यांचा विचार केला. तसेच त्यांच्या वाङ्मयनिर्मितीचा परिचय करून घेतला. बोराडे यांच्यावर बालपणापासूनच खेडूत जीवनाचे संस्कार झाल्याने त्यांनी स्वतः पाहिलेला दरिद्री, अडाणी, रूढी-परंपरेत अडकलेला माणूसच त्यांच्या लेखनाला प्रेरणा आणि दिशा देणार ठरला. तरीही व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील, पु. भा. भावे यांचे साहित्य वाचून प्रेरणा मिळाल्याचेही बोराडे सांगतात. तरीही कुणाचं अनुकरण न करता आपली स्वतःची नवी वाट त्यांनी आपल्या लेखनातून शोधली, व स्वतःचा असा चाहता वर्गही निर्माण केला. म्हणून ते ग्रामीणं जीवनाचे भाष्यकार या गौरवास पात्र ठरतात. रा. रं. बोराडे यांना अनेक सन्मान लाभले. अनेक पदावर त्यांच्या नियुक्त्या झालेल्या आहेत.

ग्रामीण आणि दलित साहित्यात येणारे प्रश्न अनुक्रमे आर्थिक आणि सामाजिक स्वरूपाचं असल्याचं मत बोराडे देतात. हे दोन्ही प्रवाह समांतर व्हावेत असे त्यांना वाटते. ग्रामीण भागात भांडवलदारांच्या हातीच सर्व आर्थिक नाड्या एकवटलेल्या असतात. याविषयीचा असंतोषच ग्रामीण साहित्यातून येताना दिसतो. ग्रामीण तरूणाना लेखनास प्रवृत्त करणं, त्यांना नवी दिशा देणं, त्यांच्यात आत्मविश्वास वाढविणं हे काम ग्रामीण साहित्य चळवळीनं करावं अस त्यांना वाटते. ग्रामीण भागात सांस्कृतिक सत्तेची केंद्रे निर्माण व्हावीत. ग्रामीण साहित्याची चळवळ यशस्वी होण्यासाठी या चळवळीविषयी आस्था असणारा, उद्दिष्ट्यांनी भारावलेला, विचाराने प्रेरित झालेल्या व्यक्तींचा समुह असावा असे मत ते मांडतात.

साहित्य लेकनामागची प्रेरणा त्यांना मराठवाड्यातील ओसाड माळरानातील माणसांकडून मिळाली. प्रथम कथाकार म्हणून नावारूपास आल्यावरही ते कादंबरीलेखनाकडे वळले. कारण मानवी जीवनाचं सर्वांगीण दर्शन घडवायला कथासाहित्य अपुरं पडतं. आपल्या अनुभवविश्वाची व्याप्ती अभिव्यक्त करण्यासाठी त्यांनी कादंबरी हा वाङ्मयप्रकार हाताळला व यशस्वीही केला. या दुसऱ्या प्रकरणात त्यांच्या वाङ्मयकर्तृत्वाची ओळख करून घेतली. त्यामध्ये त्यांनी बरेच वाङ्मयप्रकार हाताळल्याचं लक्षात येते. त्यांच्याकडील ग्रामीण संवेदनशीलतेचा प्रत्यय येतो.

तिसऱ्या प्रकरणामध्ये "'सावट' आणि 'चारापाणी' या कादंबऱ्यांतील आशयविशेष" असा विचार केला आहे. रा. रं. बोराडे यांच्या 'सावट' आणि 'चारापाणी' या दोन कादंबऱ्यातील आशय आणि त्यातील विविधता असा विचार केला. रा. रं. बोराडे नेहमीच ग्रामीण जीवनातील कोणतीही एक सामाजिक समस्या घेऊन तिचे कादंबरीतून कलात्मकतेने चित्रण करतात. दोन्ही कादंबऱ्यातून ग्रामजीवनातील बदलत्या वास्तवाची ओळख होते. 'सावट' ही कादंबरी नव्याने शिक्षण घेणाऱ्या खेड्यातील तरूणाची मानसिकता चित्रित करते. लग्नव्यवस्थेमुळे येणाऱ्या अनेक अडचणी आणि नात्यागोत्यातील ताणतणाव ही कादंबरी चित्रित करते. ग्रामीण जीवनातील साठंलोटं या लग्नपद्धतीवर ही कादंबरी प्रकाश टाकते. दामाजी या नायकाला बहिणीचा सासरा आपल्या अडाणी भाचीसाठी लग्नाची जबरदस्त इच्छा व्यक्त करतो. परंतु शिक्षण पूर्ण झाल्याशिवाय लग्नाचा विचार नसल्याचे कळविल्यावर चिडून सासरा आपल्या सुनेलाच पर्यायाने दामाजीच्या बहिणीला माहेरी पाठवून देतो. त्यामुळे आई-वडीलही काळजीत पडतात. पंतर दामाजीच्या मित्रांनी पमाच्या सासऱ्याला हातकड्या घालण्याच्या दिलेल्या धमकीमुळे संघर्षाची आणखी ठिणगी पडते. आणि परिणामी पमाला सवत आणली जाते. तिचा संसार उध्वस्त होतो. दामाजीच्या शिक्षणातही आपोआपच अडथळा निर्माण होतो. आई-वडीलही दुःखामध्ये लोटले जातात. पमाचा हट्टी, आडदांड सासरा आणि गरीब अगतिक बाप यांच्यातील संघर्षात पमाचे जीवन उध्वस्त होते. या संघर्षामध्येच 'सावट'चा आशय सामावलेला आहे.

'सावट' या कादंबरीच्या आशयातील विविधतेचाही विचार केला. ग्रामीण माणसांचे शिक्षणातील अडाणीपण तरीही अनुभवाचे शहाणपण आप्पा आणि मामा यांच्याजवळ दिसते. एखाद्या लग्नप्रसंगीच वधूवर शोधणे, वधूपक्षांना लग्नाची घाई, अडाणी बायको असेल तर संसारात विसंवादी सूर, सामाजिक जाणिवेचे चित्रण, नात्यागोत्यांना जपण्याची ग्रामीण मानसिकता, सोशिक, सहनशील अशी ग्रामीण स्त्री, खलप्रवृत्तीच्या माणसाचे निर्ढावलेपण अशा प्रकारची विविधता आशयामध्ये आढळते. 'सावट' कादंबरीचा आशय वाचकांना अंतर्मुक बनवितो. हे लेखकाचं यशच म्हणावे लागेल.

रा. रं. बोराडे यांच्या 'चारापाणी' या कादंबरीमध्ये दुष्काळामुळे निर्माण झालेली जनावरांच्या चारापाणी टंचाई हे मुख्य आशयसूत्र आहे. ग्रामीण जीवनात वारंवार पडणाऱ्या दुष्काळामुळे हतबल होणारे सामान्य शेतकरी आणि त्यांचा मोडकळीस आलेला शेतीव्यवसाय

यांचे चित्रण 'चारापाणी' या कादंबरीत रा. रं. बोराडे करतात. १९८५ च्या दुष्काळामुळे विस्कळीत झालेल्या जनजीवनाचे तसेच प्रामुख्याने प्राणीजीवनाचे चित्रण 'चारापाणी' या कादंबरीमध्ये येते. चारापाण्याविना होणारी जनावरांची तडफड आरि या परिस्थितीचा फायदा घेणारा दुष्काळाइतकाच भयंकर असा बडा जमीनदार आबाराव शेळके येथे दिसतो. शेतकरी जीवनातील 'बैल' या मुलभूत घटकाचा चारापाणी प्रश्न आणि त्यावर उपाय 'चारापाणी' कादंबरीत रा. रं. बोराडे सांगतात.

गावाचं शोषण करणाऱ्या आबाराव शेळकेच्या तावडीतून शेतकऱ्यांच्या बैलांची सोडवणूक करण्याचे नायक सुखदेव ठरवितो. त्यासाठी जनावरांच्या चारापाण्याची सोय करणं महत्त्वाचं असतं. शासनाकडून अथवा सेवाभावी संस्थाकडून चारापाणी मिळविण्याची धडपड सुखदेव करतो. शेवटी निराश होतो आणि 'मेखा मारो' आंदोलनाचा मार्ग स्वीकारतो. माणसांच्या प्रयत्नांना यश आले नाही म्हणून मुक्या प्राण्यांनाच मोर्चामध्ये सामील करतो. बैलांच्या कपाळावर मागण्यांच्या पाट्या लावल्या जातात. ते सर्व बैल तहसीलदार ऑफिससमोर मेखा मारून बांधायचे, त्यांच्या मागण्या त्यांनीच मांडायच्या अशाप्रकारे मुक्या जीवांच्या बोलक्या मागण्यांचे चित्रण हाच 'चारापाणी' कादंबरीचा आशय असलेला दिसतो.

'चारापाणी' या कादंबरीच्या आशयात विविधताही आढळते. ग्रामीण दुष्काळाचे चित्रण, दुष्काळामुळे हतबल झालेल्या शेतकरी जीवनाचं चित्रण, जनावरांवर प्रेम करणारे बाळबासारखे जातिवंत शेतकरी, पिण्याचे पाणी मिळविण्यासाठी धावपळ करणारे गावातील लोक, चारापाण्याविना गाव सोडून जाणारा दत्तू धायवट, वाळलेल्या ऊसाची राखण करणारा रंगनाथ फावडे, जनावरे विकली म्हणून सांगताना अश्रू ढाळणारे नारायणराव - राहीबाई, पाण्याचा एकेक थेंब मौल्यवान वस्तूप्रमाण जपणारी दुष्कालग्रस्त माणसं, ग्लासभर पाणी मिळविताना तोल जाऊन विहिरीत पडलेली रामा सुराशेची बायको, टँकरचं मिळणारं गढूळ पाणी तक्रार न करता पिणारे गावकरी, वृत्तपत्रीय बातम्यातून झालेले दुष्काळाचे चित्रण, शासकीय अधिकारी, पत्रकार यांचे भ्रष्ट वर्तन, स्वार्थी राज्यकर्ते, नात्यागोत्यांना जपणारी ग्रामीण मानसिकता, नवतरूणांना शिक्षणामुळे झालेली हक्कांची जाणीव, ग्रामीण विद्यार्थी संघटनेविषयीचं भाष्य, जिरायत शेतकरी आणि बडे बागायतदार यांच्यातील वाढत जाणारी दरी, ग्रामीण जीवनातील सामाजिक जाणीव, गरीब शेतकऱ्यांचं शोषण करणारा आबाराव शेळकेसारखा गावचा पिढीजात सावकार असे विविध घटनाप्रसंग आशयास विविधता आणतात.

'सावट' आणि 'चारापाणी' या कादंबरींच्या आशयातील साम्य आणि वेगळेपण यांचाही विचार केला. साम्य यामध्ये दिसते की, दोन्ही कादंबऱ्या ग्रामीण जीवनाचेच चित्रण करतात. दोन्ही कादंबऱ्यांचे नायक परिस्थितीच्या सावटामध्ये सापडलेले रा. रं. बोराडे चित्रित करतात. कौटुंबिक-सामाजिक संघर्ष, सामाजिक जाणीव, नात्यागोत्यांना जपणारी मानसिकता, शिक्षणामुळे आलेले नवे भान यामध्ये दोन्ही कादंबरीत साम्य आढळते. दोन्ही नायकांच्या बहिणी नांदणाऱ्या आहेत. खलनायकाची निर्मिती दोन्ही कादंबरीमध्ये केली आहे. खलनायकाशी लढा देताना नायकाबरोबर अनेक सामान्य माणसांची मनेही दुखावली जातात. ग्रामीण सोशीक आणि सहनशील स्त्रीजीवनाचे चित्रणही दोन्ही कादंबरीमध्ये होते. म्हणजेच शोषक आणि शोषित यांच्यातील द्वंद्व 'सावट' आणि 'चारापाणी' या दोन्ही कादंबरीत बोराडे चित्रित करतात. ग्रामीण जीवनातील अनेकविध समस्यातून निर्माण होणारे ताणतणाव, त्यामुळे सामान्य लोकांची होणारी मानसिक घुसमट याचेच चित्रण या दोन्ही लघुकादंबऱ्यामध्ये केले आहे. दोन्ही कादंबऱ्या ग्रामीण संवेदनशीलतेचा प्रत्यय देतात.

'सावट' आणि 'चारापाणी' या रा. रं. बोराडे यांच्या दोन्ही कादंबरीत काही वेगळेपणाही जाणवतो. 'सावट' या कादंबरीमध्ये नव्याने शिकणाऱ्या तरूणापुढे लग्नव्यवस्थेमुळे आलेल्या अनेक अडचणींचे चित्रण येते. तर 'चारापाणी' मध्ये ग्रामीण जीवनातील दुष्काळामुळे विस्कळीत जनजीवन आणि प्राणीजीवन यांचे चित्रण येते. जनावराचा चारापाणी प्रश्न या कादंबरीत केंद्रीभूत आहे. तर 'सावट' मध्ये ग्रामीण माणसाच्या मानसिक घुसमटीचे चित्रण येते.

'सावट' आणि 'चारापाणी' या कादंबऱ्यांचा आशय अंतर्मुख करणारा आहे. त्यामध्ये विविधताही दिसून येते. वाचकांना खिळवून ठेवण्याचं सामर्थ्य रा. रं. बोराडे यांच्या 'सावट' आणि 'चारापाणी' मध्ये असलेले दिसते.

चौथ्या प्रकरणामध्ये ''सावट' आणि 'चारापाणी' या कादंबरीतील अभिव्यक्तीविशेष'' असा विचार केला आहे. त्यामध्ये कथानक, पात्रचित्रण, निसर्गचित्रण, भाषाशैली या घटकांच्या अनुषंगाने 'सावट' आणि 'चारापाणी' चा विचार केला आहे. या प्रत्येक घटकांना कादंबरीमध्ये महत्त्वाचे स्थान असते. 'सावट' या कादंबरीचे कथानक पाहता, या कादंबरीचा नायक दामाजी कॉलेजच्या पहिल्या वर्षाला शहरात शिकत असतो. अचानक एक दिवस वडील भेटायला येतात. कारण दामाजीच्या बहिणीच्या सासऱ्याने आपल्या भाचीसाठी दामाजीला मागणी घातलेली असते. तो निरोपावर निरोप पाठवत असल्याने आईवडीलही काळजीत पडतात.

आपल्या भाचीशी दामाजीने लग्न करावे, अशी पमाच्या सासऱ्याची जबरदस्त महत्त्वाकांक्षा असते. तो दामाजीला कॉलेजवर भेटायला जातो, त्यास सूचनावजा धमकी देतो. परिणामी दामाजीचं अभ्यासावरचं लक्ष उडतं. सर्व कुटुंबच पेचात अडकल्यासारखे होते.

काहीच निरोप न दिल्याने पमाचा सासरा चिडतो आणि पमाला माहेरी पाठवितो. आपला राग तो दामाजीची बहीण पमा, म्हणजेच सुनेवर काढतो. संघर्ष चालूच राहतो. पमाला परत सासरी पाठविलं जातं. दामाजीही अभ्यासात लक्ष घालू पाहतो. अशातच पळवून नेऊन आपल्या भाचीशी पमाचा सासरा लग्न लावणार असल्याची बातमीही दामाजीस कळते. ही भीती मनात असतानाच पमाच्या गावचे लोक त्या शहरात आले असता, ते पळवून नेण्यासच आले, या भीतीत वाढ होते. मात्र त्या लोकांना मित्रांनी दिलेल्या धमकीचा परिणाम म्हणून पमाला सवत आणली जाते. तिचं जीवन उध्वस्त होतं. असं मनाला चटका लावणारं, 'सावट' या कादंबरीचं कथानक आहे. संघर्षमय, ताणतणावयुक्त आणि गतिमान असे हे कथानक आहे.

'चारापाणी' या कादंबरीचे कथानक पाहता, यामधील नायक सुखदेव नुकताच द्विपदवीधर झालेला तरूण सुट्टीला गावी येतो. तेव्हा त्यास गावाकडील दुष्काळाची भयानकता जाणवते. पाऊस नसल्याने चारा नाही, पाणी नाही अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना जनावरं जगविणं मुश्लिक झालं. दत्तू घायवटासारखा शेतकरी गाव सोडून सहकुटुंब चारापाण्याच्या शोधात जातो. गावात माणसांच्या पिण्याच्या, पाण्याची ओरड; मग जनावरांना पाणी कुठून मिळणार? मिळणार ? काही जनावरं विकली जातात. जनावरांना विकायला अथवा कसायाच्या हाती देताना जातिवंत शेतकऱ्यांचा जीव क कासाविस होतो. म्हणून बाळबा शेलारसारखा शेतकरी बैलांच्या गळ्यात दाखले बांधून त्यांना सोडून देणार असतो. आबाराव शेळके हा गावातील श्रीमंत सावकार, तो बाळबाची आणि नंतर गावातील अनेक शेतकऱ्यांची बैलं चारापाण्यावर सांभाळी घेतो.

आबारावाला बैलं सांभाळी दिल्याने गावच्या शेतीचा प्रश्न निर्माण होतो. हे सुखदेव, आबरावाकडे उसण्या अथवा कर्जाऊ कडब्याची मागणी करतो. परंतु आबाराव त्यास नकार देतो. परिणाम असा होतो की आबारावशी सुखदेवचा संघर्ष झाल्याने त्याचे वडील नारायणराव यांना आपले बैल आबारावाकडे घेऊन जायची लाज वाटते. सुखदेव गावच्या शेतकऱ्यांच्या भल्यासाठी शासनाची मदत मिळविण्याचा आटोकाट प्रयत्न करतो. तहसीलदार, बी. डी.

ओ., साखर कारखान्याचे चेअरमन आणि शेतकरी संघटनेचे तालुका संघटक अशा अनेक लोकांना भेटतो. बैलांसाठी चारापाण्याची मागणी करतो. छावण्या सुरू कराव्यात म्हणून विनंती करतो. परंतु शासनव्यवस्थेचं स्वरूप मलमपट्टीसारखे वाटते. कोणीच या मागण्यांकडे लक्ष देत नाही. त्यासाठी त्यांना वेळही नसतो. सर्जेराव शिंदेचा मुलगा जयराम आबारावची कडब्याची गंजी पेटवतो. परिणामी गावकऱ्यांचे बैल परत घरी येतात. बैल जगले तरच शेतकरी जगू शकणार होते. सुखदेव शेतकऱ्यांना त्यांची चूक लक्षात आणून देतो. त्यांना मोर्चाचा मार्ग दाखवतो. बैलांच्या कपाळावर मागण्यांच्या पाट्या बांधल्या जातात. त्यांना तहसीलदार ऑफीससमोर बांधायचं. त्यांच्या मागण्या त्यांनीच मांडायच्या. वादळ झेपावावं तसा बैलांचा ताफा तालुक्याच्या वाटेला लागतो.

अशाप्रकारचं 'चारापाणी' या कादंबरीचं कथानक शेतकऱ्यांच्या 'बैल' या घटकाच्या समस्येला केंद्रीभूत आहे. ग्रामीण जीवनातील प्राण्यांच्या समस्येला केंद्रस्थानी असे असल्याने कथानक वाचनीय बनते. रा. रं. बोराडे यांनी मधूनमधून वृत्तपत्रांतील बातम्यांचा कलात्मक वापर केल्याने दुष्काळाची तीव्रता जाणवत राहते. काही घटनाप्रसंग तुटकतुटक वाटत असले तरी वाचक खिळवून राहतो. हेच लेखकाचं यश म्हणता येईल.

रा. रं. बोराडे यांच्या 'सावट' आणि 'चारापाणी' या कादंबऱ्यातील पात्रचित्रणाचा विचार केला. त्यामध्ये मुख्य पात्रे आणि गौण तरीही पूरक असणारी पात्रे असा विचार केला. पात्रचित्रणाद्वारे व्यक्तीच्या स्वाभावाचे अनेक पैलू दिसून येतात. 'सावट' आणि 'चारापाणी' मध्ये अनुक्रमे दामाजी आणि सुखदेव यांचे पात्रचित्रण नायक म्हणून होते. तर बळवंतराव आणि आबाराव शेळके यांचे चित्रण खलनायक म्हणून होते. तसेच महत्त्वाच्या अशा पात्रांमध्ये नारायणराव, अंबादासराव, राहीबाई, माय, पमा, मल्हारी यांचा समावेश होतो.

दामाजी आणि सुखदेव हे दाघेही नायक परिस्थितीच्या भोवऱ्यात पुरते अडकलेले आहेत. सुखदेव हा 'चारापाणी'चा नायक दुष्काळाने मोडीत निघालेल्या शेतकऱ्यांना उभं करण्याचा प्रयत्न करतो. प्रसंगी कौटुंबिक संघर्ष तसेच आबाराव, सर्जेराव, शासनव्यवस्था यांच्याशी संघर्ष करावा लागतो. अन्यायाविरूद्ध लढा देत राहतो. शेवटी पर्याय म्हणून मोर्चाचा मार्ग स्वीकारतो. सर्वव्यापी दृष्टी असलेलं असं सुखदेवचं पात्र बोराडे रेखाटतात. तर 'सावट' चा नायक दामाजी शिकत असताना मध्येच लग्नाच्या मागणीने नात्यागोत्यात गुरफटला जातो. बहिणीच्या सासऱ्याची अडाणी भाची करण्यास नकार दिल्याने सरंजामी मूल्यसरणी असणारा

बहिणीचा सासरा बहीण पमास वेठीस धरतो. परिणामी सर्वजण दामाजीस दोष देत राहतात. दामाजीच्या मित्रांनी दिलेल्या धमकीमुळे पमाचा सासरा आपल्या मुलाचं दुसरं लग्न करतो. पमाचा संसार उध्वस्त होतो. दामाजीचंही शिक्षणावरील लक्ष उडते. अडाणी मुलीशी लग्न केल्यास संसार विसंवादी होतो ही जाणीव रा. रं. बोराडे या पात्राद्वारे व्यक्त करतात. तरीही संयमी, समंजस, आज्ञाधारक, जुन्या-नव्या विचारांच्या सीमारेषेवर वावरणारं हे पात्र आहे.

महत्त्वाच्या अशा खलनायक असणाऱ्या पात्रामध्ये आबाराव शेळके आणि बळवंतराव हे होते. 'चारापाणी' तील आबाराव शेळके हा श्रीमंत, गडगंज शेतकरी सावकार आहे. दुष्काळाच्या परिस्थितीचा गैरफायदा तो घेतो. माणसाच्या शरीराला एखादा जळू चिपकावा तसा तो शेतकऱ्यांचे शोषण करतो. तो आतल्या गाठीचा, चतुर असा आहे. दुष्काळाप्रमाणे तोही एक 'शेतकऱ्यांपुढे काळ' म्हणूनच बोराडे त्याचे पात्रचित्रण करतात. एक वेगळ्याच स्वरूपाचं खलनायक पात्र म्हणून त्याचे चित्रण होते. तर 'सावट' मध्ये बळवंतराव हे एक खलप्रवृत्तीचे पात्र आहे. तोही बेरकी, धोरणी आणि स्वार्थी आहे. आपला 'अहंम्' दुखावताच त्याच्या सरंजामी मनोवृत्तीतील खलनायक जागा होतो. दामाजीने नकार देताच त्याची बहीण पमा, ही आपली सून, तिचाच संसार उध्वस्त करतो. त्याची हट्टी आणि आडदांड व्यक्तिरेखा चित्रित करण्यात बोराडेंना यश आले आहे.

नारायणराव आणि अंबादासराव ही दोन पात्रेही महत्त्वाची आहेत. ही पात्रे 'सावट' आणि 'चारापाणी' मधील नायकांचे वडील म्हणून येतात. 'चारापाणी' तील नारायणराव दुष्काळामुळे निर्माण झालेल्या चारापाणी टंचाईने ग्रस्त आहेत. ते सामान्य शेतकरी असल्याने त्यांना काही जनावरं विकणं भाग पडतं. तरीही अशावेळी जावयाची जनावरे सांभाळण्यासाठी पाठविली जातात. तेव्हा ती निमूटपणे ठेवून घेतात. नातीगोती जपणाऱ्या मनोवृत्तीचे चित्रण या पात्राद्वारे होते. 'सावट' मधील अंबादासराव हेही अशाच प्रकारचं एक पात्र आहे. अंबादासरावही पमाच्या सुखी संसारासाठी दामाजीने पमाच्या सासऱ्याच्या भाचीशी लग्न करावे, म्हणजे पमा सुखी होईल. नात्यागोत्यातील ताणतणाव न तुटता सुटावेत यासाठी प्रसंगी आपल्या इच्छा आकांक्षांना मूठमाती देणारं पात्र म्हणून या पात्रचित्रणाकडे पहावे लागेल.

'सावट' आणि 'चारापाणी' मधील स्त्रीजीवनाचं चित्रण राहीबाई, माय, पमा या पात्राद्वारे रा. रं. बोराडे करतात. राहीबाई, माय याही आपल्या मुलीच्या सुखी संसारासाठी तळमळत राहतात. मुलीच्या सासरच्या लोकांची मनधरणी करतात. संसार सावरून घेणाऱ्या

अस्सल ग्रामीण स्त्रीजीवनाचं चित्रण या पात्राद्वारे होते. पमाच्या चित्रणाद्वारे ग्रामीण जीवनातील 'सून' आणि 'लेक' या घटकावर प्रकाश पडतो. इथे हे पात्र पुरूषी वर्चस्वाला बळी पडल्याचे रा. रं. बोराडे चित्रित करतात. एकूणच रा. रं. बोराडे यांच्या कादंबऱ्यांतील स्त्रीपात्रे सोशिक, सहनशील अशीच आहेत.

'सावट' आणि 'चारापाणी' मध्ये बोराडे काही घटनाप्रसंगही चित्रित करतात. हे प्रसंग जसेच्या तसे वाचकाच्या डोळ्यासमोर उभे करण्याचं सामर्थ्य रा. रं. बोराडे यांच्या लेखनात आहे. 'सावट' मधील पमाच्या लग्नातील प्रसंग, पमाला माहेरी पाठविल्याचा प्रसंग, तिला सवत आणल्याचा प्रसंग चित्रित करण्यात लेखकास यश आले आहे. 'चारापाणी' या कादंबरीतील बाळबा शेलारने बैलांच्या गळ्यात दाखले बांधल्याचा प्रसंग, आबाराव शेळकेने बैल सांभाळी घेतल्याचा प्रसंग, रामा सुराशेची बायको विहिरीत पडल्याचा प्रसंग, जावयाची जनावरे संभाळण्यासाठी पाठविल्याचा प्रसंग - असे अनेक प्रसंग कादंबरीच्या आशयाला बळकटी आणतात. त्यामुळे प्रसंगचित्रणात जिवंतपणा आला आहे.

रा. रं. बोराडे यांच्या 'सावट' आणि 'चारापाणी' या कादंबऱ्यांमधून निसर्गचित्रणही आले आहे. निसर्गचित्रणामुळे कादंबरीच्या कथानकाला उठावदारपणा येतो. रा. रं. बोराडे यांनी कथानकाच्या अनुषंगाने मधून - मधून हे निसर्गचित्रण केले आहे. 'चारापाणी' मध्ये दुष्काळाच्या छायेमुळे उजाड, ओसाड निसर्गाचं चित्रण येते. तर 'सावट' मध्ये कुठेतरी एखादा निसर्गचित्रणाचा संदर्भ येतो. कारण येथे भर दिला आहे तो माणसांच्या अंतर्गत मानसिकतेवर, मनातील द्वंद्वावर.

'सावट' आणि 'चारापाणी' या कादंबऱ्यांच्या भाषाशैलीमध्ये निवेदनाची भाषा आणि संवादाची भाषा असा विचार केला. 'सावट' चे निवेदन हे प्रथमपुरूषी आहे. तर 'चारापाणी' चे निवेदन तृतीयपुरूषी आहे. दोन्ही कादंबऱ्यांच्या निवेदनात ग्रामीण-नागर संमिश्रता आहे. संवाद मात्र ग्रामीण बोलीमध्ये अधिक आहेत. निवेदन गतीमान आहे, तसेच संवादही बोलके आहेत. अन्य भाषाविशेषांचाही विचार केला. त्यामध्ये निवेदनात आलेले सादशब्द, नादानुकारी शब्द, म्हणी - वाक्प्रचार, उपमा, प्रतिक-प्रतिमांचा वापर, शिव्यासदृश्य शब्द, शेतीशी निगडीत शब्द, इंग्रजी-हिंदी शब्द, मराठवाडी बोलीतील शब्दांचा वापर याचाही विचार केला आहे. अशा भाषाविशेषांच्या वापरामुळे कादंबरीच्या घटनाप्रसंगांना जिवंतपणा आला आहे. यामुळे 'सावट' आणि 'चारापाणी' या कादंबऱ्या वाचनीय बनतात. अशाप्रकारे या दोन कादंबऱ्यांच्या

अभिव्यक्तीविशेषांचा विचार केला.

'सावट' आणि 'चारापाणी' या कादंबऱ्यांच्या आशय आणि अभिव्यक्ती यांचा विचार करीत असताना रा. रं. बोराडे यांच्या कादंबरी लेखनाचे काही विशेष जाणवतात. त्यामध्ये प्रथम लक्षात येते की, रा. रं. बोराडे कादंबऱ्यांमधून ग्रामीण वास्तवाचं चित्रण करतात. ग्रामीण जीवनातील सामाजिक प्रश्नांचे भान त्यांना आहे. कारण त्यांचा जन्मच मुळात खेड्यातील सामान्य शेतकरी कुटुंबात झाला आहे. कौटुंबिक संघर्षाचे चित्रण त्यांच्या कादंबऱ्यांमध्ये येते. नात्यागोत्यातील ताणतणाव, नातीगोती जपण्याची प्रवृत्ती यांचे चित्रणही रा. रं. बोराडे करतात. वडील-मुलगा, पती-पत्नी, आई-मुलगा यांच्यातील संबंध, संघर्ष यांचे चित्रण बोराडे करतात. पारंपारिक जीवन स्वीकारल्यामुळे निर्माण होणाऱ्या समस्यांचं चित्रणही त्यांच्या कादंबऱ्यात येते. त्यांच्या कथेप्रमाणे कादंबरीतही जावई पात्र सुद्धा थोड्याफार प्रमाणात चित्रित होते.

ग्रामीण दुष्काळाचं चित्रणही ते कादंबरीतून करतात. त्यावर उपाययोजना चित्रित करतात. शासकीय अधिकारी वर्गाचा दुष्काळाकडे, शेती, शेतकरी यांच्यांकडे पाहण्याचा दृष्टिकोन यावर रा. रं. बोराडे कादंबरीलेखनातून प्रकाश टाकतात. शेती आणि शेतकऱ्यांच्या समस्या यांना केंद्रस्थानी ठेवूनच रा.रं. बोराडे कादंबरीलेखन करतात. मधूनमधून ते शिक्षणावर, त्यातील विषमतेवरही भाष्य करीत राहतात, ग्रामीण जीवनातील राजकारणाचे दर्शनही त्यांच्या कादंबऱ्यांमधून होते. भ्रष्ट, ढोंगी, स्वार्थी राज्यकर्त्यांचे चित्रण रा. रं. बोराडे प्रसंगानुरूप करतात. राज्यकर्त्यांकडून गरीब जनतेचे होणारे शोषण पाहून लेखकाची संवेदनशीलता जागी होते. कारण त्यांच्याकडे अस्सल ग्रामीण संवेदनशीलता आहे. नव्याने शिक्षण घेणाऱ्या ग्रामीण तरूणासमोर येणाऱ्या अनेक अडचणींचे चित्रण रा. रं. बोराडे करतात. खेड्यातील साठंलोटं या लग्नपद्धतीवरही ते प्रकाश टाकतात. यांत्रिकीकरणाच्या आगमनाचे चित्रणही ते करतात. म्हणूनच 'चारापाणी' मध्ये साखर कारखान्याच्या चेअरमनला शेतकऱ्यांच्या बैलांची गरज वाटत नाही. प्राणी-जीवनातील बैल या घटकाला कादंबरीत केंद्रस्थानी ठेवले आहे म्हणून हा नवा प्रयोग म्हणता येईल. शेतकऱ्यांविषयी त्यांच्या लेखनात तळमळ व्यक्त होते. यामुळे म. फुले यांच्या 'शेतकऱ्यांचा आसूड' शी या कादंबरीची तुलना होऊ शकते. शोषक आणि शोषित यांच्यातील पिळवणुकीचे चित्रण ते करतात. दोन पिढ्यतील संघर्ष, सरंजामी, निजामी राजवट उपभोगलेल्या हट्टी, आडदांड खलपुरूषांचे चित्रण ही ते करतात. वृत्तपत्रातील कात्रणांचा कादंबरीलेखनात ते कलात्मकतेने वापर करतात. मुक्या प्राण्यांनी बंड करणे हा नवा

विचार रा. रं. बोराडे यांच्या कादंबरीतून मिळतो. 'मेखा मारो' आंदोलनाचा वापरही ते कलात्मकतेने करतात.

रा. रं. बोराडे यांची कथावस्तूवर जबरदस्त पकड असलेली दिसते. तसेच सुरूवातीस काही पेचप्रसंग निर्माण करून मग निवेदन गती घेते. फाफटपसाऱ्याचा अभाव, नवे ग्रामीण शब्द वापरण्याची लकब, संवादावर भर, संवादही बोलके मिताक्षरी, ग्रामीण बोलीचा कलात्मक वापरही ते कादंबरीमध्ये करतात. म्हणी, वाक्प्रचार, प्रतिक-प्रतिमा यांचा चपलखपणे वापर बोराडे करतात. अशी अनेक वैशिष्ट्ये रा. रं. बोराडे यांच्या कादंबरीलेखनाची जाणवतात.

रा. रं. बोराडे यांच्या कादंबरीलेखनाबाबत काही मर्यादाही जाणवतात. बोराडे कादंबरीसाठी एखादा विषय निवडतात. परंतु तो विषय अभिव्यक्त करताना कादंबरीचा मोठा पट ते गाठू शकत नाहीत. परिणामी तिला लघुकादंबरीचा घाट प्राप्त होतो. 'सावट' आणि 'चारापाणी' या कादंबऱ्यांचा समावेश लघुकादंबऱ्यांमध्ये होतो. कारण बोराडे ग्रामीन जीवन एवढेच क्षेत्र नजरेसमोर ठेवतात, त्यामुळे अशी व्यापकतेची मर्यादा जाणवत असावी. तसेच केवळ वाचकाचं रंजन व्हावं असे लेखन करणेही त्यांना आवडत नाही. तसेच कुठेही पाल्हाळपणा नाही, जे वास्तव जीवन आहे तेच नेमकेपणे आणि गांभीर्याने रेखाटणे याकडे त्यांचा कल दिसतो.

तरीही, मराठी ग्रामीण कादंबरीच्या क्षेत्रात व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील यांच्यानंतर रा. रं. बोराडे यांचेच नाव घ्यावे लागेल. त्यांच्या 'सावट' आणि 'चारापाणी' या कादंबऱ्यांनी काही मर्यादा मान्य करूनही मराठी ग्रामीण कादंबरीत मोलाची भर घातली आहे. ग्रामीण कादंबरीच्या क्षेत्रात रा. रं. बोराडे यांनी आपल्या स्वलेखन गुणाच्या बळावर आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे. म्हणूनच ते एक महत्त्वाचे कादंबरीकार आहेत असे स्पष्टपणे म्हणता येईल.